देशी दारु किरकोळ विक्रीच्या सीएल-३ अनुज्ञप्त्या आणि विदेशी दारु किरकोळ विक्रीच्या एफएल-२ अनुज्ञप्त्यांची पुन :स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन परिपत्रक क्र.सीएलआर ११०७/प्र.क्र.१६/इएक्ससी-३,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : १९ सप्टेंबर, २००७..

**प्रस्तावना :** राज्यात सन १९७३-७४ मध्ये देशी दारु किरकोळ विक्रीच्या सीएल-३ अनुज्ञप्त्या आणि विदेशी दारु किरकोळ विक्रीच्या एफएल-२ अनुज्ञप्त्या मंजूर केल्या होत्या. या मंजूर करण्यात आलेल्या अनुज्ञप्त्यापैकी काही अनुज्ञप्त्या वेगवेगळया कारणामुळे बंद पडलेल्या आहेत. अशा बंद पडलेल्या अनुज्ञप्त्यांचे पुर्नज्जीवन करण्याकरिता शासन पत्र क्र. बीपीए १०८९/पीआरओ-२, दि. ६.७.८९ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर पत्रामध्ये सीएल-३ अनुज्ञप्त्यांच्या बाबतीत दि. ३१.५.८६ पूर्वी आणि एफएल-२ अनुज्ञप्त्यांच्या बाबतीत दि. १७.२.८९ पूर्वी संबंधीतांनी, संबंधीत जिल्हाधिकारी , आयुक्त, रा.उ.शु. आणि राज्य शासन यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक असल्याची अट नमूद करण्यात आली आहे. शासनाच्या सदर दि. ६.७.८९ च्या पत्रास श्री. लक्ष्मण आर. वाजगे यांनी रिट याचिका क्र. ६३९/९४ व श्री. सुरेंद्रसिंग सोमय्यासिंग यांनी रिट याचिका क्र. १२५२/९५ याद्वारे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हानित केले. सदर दाखल रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १.९.२००४ च्या आदेशान्वये, मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम १३९ (२) मधील तरतूदीनुसार कार्यवाही केली नसल्याने संबंधीत प्रकरणी शासनाचे दि. ६.७.८९ च्या पत्रामधील तरतूदीकडे दुर्लक्षित करून निर्णय घेण्याचे आदेश पारित केले. त्या अनुषंगाने सध्या अशा बंद असलेल्या अनुज्ञप्त्यांचे पुर्नःस्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दि. १.९.२००४ रोजी पारित केलेल्या आदेशाबाबत अधिक्षक, रा.उ.शु. हे अनभिज्ञ असल्यामुळे सध्या सुध्दा शासन पत्र, दि. ६.७.८९ मधील तरतूदीनुसार त्यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सीएल-३ अनुज्ञप्त्यांच्याबाबतीत दि. ३१.५.८६ नंतर आणि एफएल-२ अनुज्ञत्याबाबतीत दि. १७.२.८९ नंतर या अनुज्ञप्त्या बंद पडल्या असल्यास अशा अनुज्ञप्त्याच्या पुर्नस्थापनेबाबत कोणती कार्यवाही करावी, याबाबत सध्या नियमामध्ये कोणतीही तरतूद नाही. देशी दारु किरकोळ विक्रीच्या सीएल-३ अनुज्ञप्त्या आणि विदेशी दारु किरकोळ विक्रीच्या एफएल-२

जिल्हाधिकारी ...
शाखा:- DC
आवक नं:-
१० OCT 2007
विवरण नं:-

E:\20\Shubhangi\Exc-3/GR

अनुज्ञप्त्याचे नूतनीकरण १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत करण्यात येते. महाराष्ट्र देशी दारु नियम १९७३ मधील नियम २४(२ ए ) आणि मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ मधील नियम २६- अ मधील तरतूदीनुसार या सीएल-३ व एफएल-२ अनुज्ञप्त्यांचे विहीत तारखेपूर्वी ( ३१ मार्च पूर्वी ) नूतनीकरण झाले नाही तर अशा अनुज्ञप्त्या व्यपगत होतात. अशा अनुज्ञप्त्यांचे नूतनीकरण करण्याबाबत नियमांमध्ये कोणतीही तरतूद नाही. अशा प्रकारे वस्तुस्थिती असताना देखील सीएल-३ व एफएल-२ अनुज्ञप्त्याचे पुनःर्स्थापना/नूतनीकरण केले जात असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असून राज्यात सर्व जिल्हयामध्ये अनुज्ञप्त्यांच्या पुनःर्स्थापना करण्याबाबतच्या कार्यवाहीमध्ये सुसंगती, एकवाक्यता व सुसूत्रतता नाही.

**परिपत्रक :-** अशा प्रकारे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १.९.२००४ रोजी दिलेले आदेश आणि महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ व मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मधील तरतूदी लक्षात घेता खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

१) महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ व मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मधील तरतूदीनुसार अनुक्रमे सीएल-३ व एफएल-२ अनुज्ञप्त्यांचे विहीत तारखेपूर्वी म्हणजे दि. ३१ मार्च पूर्वी नूतनीकरण करण्यात आले नाही तर, यासाठीचे धोरण निश्चित होईपर्यंत, अशा अनुज्ञप्त्यांचे नूतनीकरण करण्यात येवू नये.

२) शासन पत्र क्र. बीपीए १०८९/ पीआरओ-२ दि. ६.७.८९ अन्वये कोणत्याही अनुज्ञप्त्यांची, शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत , पुनःर्स्थापना/ नूतनीकरण करण्यात येवू नये.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

१९।९।०७

( दे. आ. गावडे )

अवर सचिव,महाराष्ट्र शासन, गृह विभाग

७/११ प्रति;

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व विभागीय उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क
सर्व अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क,
निवडनस्ती/इएक्ससी-३

E:\20\Shubhangi\Exc-3/GR

2